दै. सकाळ - Edumantra
३ जून २००९

नव्या वाटा

महेश नरके

# पॅकेजिंग करिअर

बाजारपेठेच्या तीव्र स्पर्धेमध्ये उत्पादनांना 'आयडेंटी' देण्याच्या दृष्टीने पॅकेजिंग, अर्थात वेष्टनीकरणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहेच, परंतु 'बिझनेस स्ट्रॅटेजी'च्या दृष्टिकोनातूनही या क्षेत्राचा खुबीने वापर होतो आहे. उत्पादने तयार झाल्यापासून ती ग्राहकापर्यंत पोचविण्यासाठी वेगवेगळ्या टप्प्यांवरील पॅकेजिंगच्या गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी पॅकेजिंग तंत्रज्ञांकडे असते. खाद्य पदार्थ, औषधासारख्या उत्पादनांसाठी तर पॅकेजिंग मटेरिअल्सची योग्यता, पात्रता निरखून घेणे, आवश्यकतेनुसार अशी मटेरिअल्स तयार करवून घेणे, या तंत्रज्ञांच्या कार्यकक्षेत येते.

**पॅकेजिंग डिझाइन** : आपल्या आजूबाजूच्या नेहमीच्या वापराच्या वस्तूंवर नजर फिरविल्यास पॅकेजिंग डिझाइन आणि त्यासाठी लागणाऱ्या कल्पकतेचा आवाका सहजी लक्षात येईल. उत्तम कल्पनाशक्ती, ग्राहकाची मानसिकता आणि सवयींचा सूक्ष्म अभ्यास, व्यावहारिकता आदी क्षमतांची सांगड घालू शकणाऱ्या युवकांसाठी हे नवीन क्षेत्र उपलब्ध आहे.

**पॅकेजिंग सोर्सिंग अँड व्हेडर डेव्हलपमेंट** : कंपनीला आवश्यकतेनुसार पॅकेजिंग मटेरिअल्स उपलब्ध करून देणे, नवीन उत्पादनांसाठी पुरवठादारांकडून पर्याय मागविणे, उत्तम पर्यायांची निवड करणे आणि त्यांचा विनाव्यत्यय पुरवठा होईल, याची काळजी घेण्याची जबाबदारी या 'एक्झिक्युटिव्हज'वर असते. इंडियन इन्स्टिट्यूट फॉर पॅकेजिंग, मुंबई ही या क्षेत्रात काम करणारी प्रथितयश स्वयंशासित संस्था आहे. पॅकेजिंग क्षेत्राकरिता विशिष्ट क्षमता असणारी मनुष्यबळनिर्मिती करण्याकरिता ही संस्था पुढील अभ्यासक्रम राबविते...

**१) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन पॅकेजिंग.**

**कालावधी** : २ वर्षे - पूर्णवेळ

**पात्रता** : शास्त्र पदवीधारक (फिजिक्स/केमिस्ट्री/मॅथेमॅटिक्स अगर मायक्रोबायोलॉजीसह)

अगर

ॲग्रिकल्चर / फूड सायन्स / अभियांत्रिकी पदवी (द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण)

**प्रवेश परीक्षा** : १८ जून २००९

**उपलब्ध जागा** : मुंबई - ५०

दिल्ली - ५०

**२) ग्रॅज्युएट डिप्लोमा इन पॅकेजिंग.**

**कालावधी** - दीड वर्ष (पत्राद्वारा)

**पात्रता** : शास्त्र / अभियांत्रिकी / वाणिज्य / कला शाखेची पदवी + १ वर्ष कार्यानुभव.

अगर

अभियांत्रिकी पदविका + २ वर्षांचा कार्यानुभव

**३) सर्टिफिकेट प्रोग्राम इन पॅकेजिंग.**

**कालावधी** : ३ महिने (पूर्ण वेळ)

**पात्रता** : कोणत्याही शाखेचा पदवीधारक / अभियांत्रिकी पदवीधारक. स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी कमी कालावधीचा उपयुक्त अभ्यासक्रम.